ISSN: 2249-894X Impact Factor : 5.7631(UIF)
Volume - 8 | Issue - 6 | March - 2019
REVIEW OF RESEARCH
International Online Multidisciplinary Journal
UGC APPROVED
Journal No.: 48514

# सीमावर्ती विद्यापीठीय पातळीवरील मराठी विषयाचे अध्ययन आणि अध्यापन : दशा आणि दिशा (संदर्भ– देगलूर–उदगीर तालुका)



डॉ. विठ्ठल जंबाले

डॉ. विठ्ठल जंबाले

पदवी आणि पदव्युत्तर मराठी विभाग प्रमुख, संचालक, मराठी भाषा साहित्य संशोधन केंद्र,देगलूर महाविद्यालय देगलूर.

प्रस्तावना : एकविसाव्या शतकातील दुसरे दशक संपत आलेले आहे, "अध्ययन–अध्यापन ज्यावत समाविष्ट असते, ती शिक्षण प्रक्रिया" आणि एक आधुनिक भारतीय भाषा मराठी या तीनही घटकांचा परस्परसंबंध समजून घेणे आवश्यक.............

Editor - In - Chief - Ashok Yakkaldevi

International Online Multidisciplinary Journal
Review of Research
Save Tree, Save Paper, Save World
ISSN NO:- 2249-894X Impact Factor : 5.7631(UIF) Vol.- 8, Issue -6, March -2019

# Content


| Sr. No. | Title and Name of The Author (S) | Page No. |
|---|---|---|
| 1 | सीमावर्ती विद्यापीठीय पातळीवरील मराठी विषयाचे अध्ययन आणि अध्यापन : दशा आणि दिशा (संदर्भ- देगलूर-उदगीर तालुका)<br>डॉ. विठ्ठल जंबाले | 1 |
| 2 | **Experimental Learning: Art Integrated Learning In Chemistry**<br>Prashant Thote and Gowri S . | 8 |
| 3 | **Role Of Agriculture In Indian Economy, And Contemporary Problems Of Farmers In India, An Overview**<br>Sitaram Uttamrao Anpat | 11 |
| 4 | **भारतीय समाज की समस्याओं का समाजशास्त्रीय अनुशीलन (मादक द्रव्य व्यसन के विशेष संदर्भ में )**<br>मैनपाल | 17 |
| 5 | **The Responsibility Of Media In Changing The Society**<br>Saibanna Eranna Guduba and Dr. D.B Patil | 21 |
| 6 | **The East-West Encounter In Chetan Bhagat's Novel: *One Night @ The Call Centre***<br>Dr. Sanjay K. Khilare | 27 |
| 7 | **Environmental Attutude Of B.Ed. and D.Ed. Teacher Trainees**<br>Dr. Pakala Naga Suresh Kumar and Dr. T. Swaruapa Rani | 32 |
| 8 | **Regional, National And International Trends In Teacher Training Programme**<br>Dr. S. L. Suresh | 37 |
| 9 | **A Study On Teacher Effectiveness Of The Teacher Educators**<br>Dr. T. M. Gnanasoundari | 43 |

REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 6 | MARCH - 2019

# सीमावर्ती विद्यापीठीय पातळीवरील मराठी विषयाचे अध्ययन आणि अध्यापन : दशा आणि दिशा (संदर्भ- देगलूर-उदगीर तालुका)

डॉ. विठ्ठल जंबाले
पदवी आणि पदव्युत्तर मराठी विभाग प्रमुख, संचालक, मराठी भाषा साहित्य संशोधन केंद्र,
देगलूर महाविद्यालय देगलूर.



एकविसाव्या शतकातील दुसरे दशक संपत आलेले आहे, "अध्ययन-अध्यापन न्यात समाविष्ट असते, ती शिक्षण प्रक्रिया" आणि एक आधुनिक भारतीय भाषा मराठी या तीनही घटकांचा परस्परसंबंध समजून घेणे आवश्यक आहे. शिक्षण प्रक्रियेतून समाजात मूकपणे क्रांती होत असते. व्यक्तीच्या आणि समाजाच्या विकास प्रक्रियेत शिक्षणाचा महत्वाचा वाटा असतो. या शिक्षणव्यवस्थेत भाषेचे नेमके स्थान शोधणे महत्त्वाचे आहे. असे म्हणतात की, शिक्षणप्रक्रियेत भाषेचे स्थान मध्यवर्ती असणे निकडीचे आहे. अशा शब्दात भाषेचे शिक्षण प्रकियेतील केंद्रवर्ती स्थान खरे तर शिक्षणतज्ञांनी मान्य केलेले आहे. आज वाढत्या स्पर्धेच्या युगात बहुसंख्य विद्यार्थ्यांचा अधिकाधिक गुणदान मिळणाऱ्या विषयांकडे ओढा आहे. महाराष्ट्रातील सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये पहिलीपासून मराठी अनिवार्य म्हणून शिकवित नाहीत. तो अनिवार्य करणे बाबतचे धोरण सध्या सरकारने घोषित केले आहे. ते राबवले तर मराठीच्या विकासाला मदत होईल.

ज्ञानभाषा- राजभाषा आणि महाराष्ट्राची प्रादेशिक भाषा म्हणून मराठीचा वापर करणे गरजेचे आहे. मातृभाषा आणि माध्यमभाषा या दोन्ही स्तरावर मराठीचे उपयोजन आवश्यक आहे. एकविसावे शतक हे अलिकडे कालप्रवाहाच्या रेट्यामुळे बदलले आहे असे नव्हे, तर विसाव्या शतकातील वैज्ञानिक आणि सांस्कृतिक घटनांमुळे ते बदलत आहे. या शतकाचा चेहरा वाचण्यासाठी संगणकक्रांती, जागतिकीकरण आणि तीव्र जीवनकलह ही या शतकाची ठळक वैशिष्ट्ये. समकालीन वास्तवात तंत्रज्ञान आणि व्यवस्थापन या शाखा इतर शाखेच्या विद्यार्थ्यांवर कुरघोडी करत आहेत. या बदलत्या सामाजिक पर्यावरणातील मराठी विषयाचे अध्यापन कोणत्या सूत्रावर आधारित केले पाहिजे, या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा हा प्रयत्न आहे.

मराठी ही महाराष्ट्राची राजभाषा, येथील अनेक विद्यार्थ्यांची मातृभाषा येथील काही विद्यापीठांची माध्यमभाषा हे लक्षात ठेवावे लागते. विद्यापीठीय पातळीवर अध्ययन-अध्यापन व्यवहाराला दिशा देण्याचे काम अभ्यासक्रम करीत असतात. अभ्यासक्रम हे मुळात शैक्षणिक उद्दिष्टपूर्तीचे साधन असतात. भाषा विषयाचे विशेषतः मराठी विषयाच्या अभ्यासक्रमाची आखणी करताना विद्यार्थ्यांच्या भावनिक - बौद्धिक गरजा आणि समकालीन वास्तवाशी निगडित विशिष्ट गरजा यांचा विचार करणे अभिप्रेत असते. या पार्श्वभूमीवर आणि एकविसाव्या शतकातील

दुसरे दशक लक्ष वेधून घेते. या शब्दप्रयोगातून सामाजिक बदल सूचित होत आहे, तो बदल कोणत्या स्वरूपाचा आहे, यास अनुलक्षून मराठी विषयाच्या अभ्यासक्रमाच्या अध्ययन आणि अध्यापनाची दिशा निश्चित करणे अपेक्षित आहे.

**मराठीच्या अभ्यासक्रमातील सूत्र –**

सीमाभागातील असो किंवा अन्यत्र कोणत्याही ठिकाणी विद्यापीठीय पातळीवर मराठी विषयाचे अध्ययन करणारे विद्यार्थी लक्षात घेता अभ्यासक्रमाची रचना करण्यात येते. मराठीच्या अभ्यासक्रमाची पुनर्मांडणी मागील सूत्रानुसार मराठी अभ्यासक्रमात केवळ वरवरचे बदल करून साध्य होणार नाही. तर अभ्यासक्रमाची बहुतांशपणे पुनर्मांडणी करणे गरजेचे आहे. साधारणतः बदलत्या काळाची आव्हाने पेलण्यासाठी सक्षम अभ्यासक्रम आवश्यक ठरेल. त्याची कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

मराठी ज्यांची मातृभाषा आहे, असे सर्वच विद्यार्थी मराठी भाषा अभ्यासवर्गात असतीलच असे नाही. निजभाषा मराठी असणारे विद्यार्थी दिवसेंदिवस इतर पर्यायी विषयात जास्त प्रमाणात शिकत आहेत, या पार्श्वभूमीवर बदलते संदर्भ लक्षात घेऊन अभ्यासक्रमाची पुनर्मांडणी करणे आवश्यक आहे. ज्यामध्ये अमराठी भाषिक विद्यार्थ्यांना उपयुक्तता जाणवेल. त्यांचे मराठी शिकण्याकडे लक्ष वेधता येईल. आपल्याकडे भाषिक उद्दिष्टेसमोर ठेवून मराठीचा अभ्यासक्रम असायला हवा. परंतु पुढील काळात बदलत्या परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी मराठी विषयाचा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना आकृष्ट करणारा असावा. भाषा अभ्यास आणि साहित्याभ्यास यांची योग्य सांगड घालणारा अभ्यासक्रम चालू ठेवणारा प्रयोगशील अभ्यासक्रम आवश्यक आहे.

**भाषालक्ष्यी अभ्यासक्रम –**

भाषा ही मानवी जगण्यामध्ये एकजीव झालेली असते. तिचे सौंदर्य व तिची क्षमता याची जाण वाढविणारा आणि वापराचे भान देणारा आणि भाषेबाबतची मर्मदृष्टी अधिकाधिक विकसित करणारा अभ्यासक्रम अपेक्षित असावा. हा अभ्यासक्रम केवळ उपयोजित मराठीचा अभ्यासक्रम नसावा. भाषाविषयक कुतूहल जागृत करण्यापासून ते भाषेच्या वेगवेगळ्या संदर्भक्षेत्रांशी निगडित व्यावहारिक प्रयोजनापर्यंत अनेक उद्दिष्टांचा त्यात समावेश असावा. हा अभ्यासक्रम कला, वाणिज्य व विज्ञान या तिन्ही शाखांच्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्रपणे क्रमविकासी पद्धतीने आखण्यात यावा. मराठी निजभाषा नसलेले, पण मराठीविषयी जिव्हाळा असलेले विद्यार्थी मराठीकडे वळवण्यात यामुळे यश येईल. मानव्यविद्या शाखांमध्ये बहुतांशपणे मराठी ही माध्यमांची भाषा आहे. म्हणून मराठीचा अभ्यासक्रम सक्तीचा करणे आवश्यक आहे.

मराठी शिकविणारा शिक्षक हा मराठीचा शिक्षक असतो. मराठी माध्यमातून इतर विषय शिकवणारा शिक्षक हा सुद्धा मराठी भाषेमधून शिक्षण देत असतो. परंतु हे त्यांचे भाषाज्ञान उत्कृष्ट असतोच, असे फारसे जाणवत नाही. त्यामुळे ज्ञानभाषा म्हणून मराठीची प्रगती साधण्यासाठी सामाजिकशास्त्राचे अध्यापक भाषा जाण असलेले उपयुक्त ठरेल. त्यामुळे शक्य होईल तेथे माध्यमभाषा मराठी नसेल, तेथेही या अभ्यासक्रमाचा पर्याय उपलब्ध असलाच पाहिजे.

**साहित्यलक्षी अभ्यासक्रम –**

शिक्षणविषयक योजनांमध्ये भाषांची गणना पायाभूत अभ्यासक्रमात केलेली आहे. अर्थात तेथे भाषेकडे संस्काराचे माध्यम म्हणून पाहिलेले असते. साहित्यलक्ष्यी (ललित आणि वैचारिक साहित्य) अभ्यासक्रम हेच उद्दिष्टे समोर ठेवणारा असतो. त्यामुळे या अभ्यासक्रमाचे पर्याय उच्च माध्यमिक स्तरावरील कला, वाणिज्य व विज्ञान या

तिन्ही शाखांसाठी आवश्यक द्वितीय भाषा गटात असतात, ते उपयुक्त आहेच. ललित आणि वैचारिक साहित्याच्या अध्ययनातून साधावयाची उद्दिष्टे दोन प्रकारचे असतात. समीपवर्ती उद्दिष्ट आणि दूरगामी उद्दिष्टे. समीपवर्ती उद्दिष्टांमध्ये विद्यार्थ्यांना साहित्याच्या व संस्कृतीच्या परंपरेची ओळख करून देणे, साहित्य कलाकृतीचा आस्वाद घेता येणे, कलात्मक सौंदर्याचा अनुभव घेणे इत्यादी उद्दिष्टे समाविष्ट असतात, तर दूरगामी उद्दिष्टांमध्ये सौंदर्याभिरूची निर्माण करणे, संवेदनशीलता जागृत ठेवणे, नैतिक मूल्यांचे संस्कार करणे, व्यापक जीवनाचे भान आणणे, सहानुभाव निर्माण करणे इत्यादी उद्दिष्टे प्रविष्ट असतात. एक प्रकारे विद्यार्थ्यांचे बौद्धिक आणि भावनिक पोषण करणे, तसेच त्यांना (समाजाचे आणि विश्वाचे) सुसंस्कृत नागरिक बनविणे, हे ईप्सित साध्य करायचे असते. ही सर्व उद्दिष्टे वास्तविक व्यक्तीला अंतरिक संपन्नता देणारी बैठक देणारी असतात. तरीही भाषांना आज सन्मानाचे स्थान नाही. अनेक वेळा समोर उद्दिष्टे चांगली असली म्हणजे अभ्यासक्रम चांगला तयार होतोच, असे नाही. विविध पातळीवरील तडजोडी, नियोजनात कल्पकतेचा अभाव, शैक्षणिक वातावरणातील मरगळ इत्यादी कारणांमुळे अध्ययन-अध्यापन क्रमविकासी, नीरस, धुसर, अनाकलनीय बनतो. काही वेळा अभ्यासक्रम अतिमहत्त्वाकांक्षी असून सर्व उद्दिष्टे एकसमयावच्छेदेकरून साधण्याचे प्रयत्न करतात.

उदाहरणार्थ–विद्यापीठीय अभ्यासक्रमात पुढील उद्दिष्टे साधण्याबाबत अपेक्षा व्यक्त केलेली आहे. प्राचीन व आधुनिक साहित्याचा प्रातिनिधिक परिचय, ज्ञानप्राप्ती, आनंदप्राप्ती, वाङ्मयीन प्रवाह व प्रवृत्तीचे आकलन, निकोप सामाजिकदृष्टी निर्माण, कलाकृतीचे आकलन व आस्वाद, चिंतनशीलता, निर्मिती प्रेरणेचे पोषण, जीवनमूल्यांचे संस्कार, भाषिककौशल्य या उद्दिष्टांशी बांधिलकी ठेवून प्रथम वर्षाचा अभ्यासक्रम तयार करण्यात येतो. परंतु "आधुनिक मराठी साहित्यातील विविध प्रकारांचा परिचय घडविणे, त्यांचे आकलन करून देणे, वाङ्मयाबद्दलची अभिरुची वाढविणे, कलाकृतींचा आस्वाद घेण्याची क्षमता निर्माण करणे" एवढीच मर्यादित उद्दिष्टे पदवी स्तरावरील अभ्यासक्रमात गृहित धरलेली दिसतात. त्यामुळे पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांकडून वाजवीपेक्षा अधिक अपेक्षा करणे चुकीचे वाटते. त्यात कालसुसंगत बदल करणे आवश्यक आहे.

पदवी स्तरावरील मराठी विषयाच्या अभ्यासक्रमाचे धोरण पूर्वापार चालत आलेले आहे. एकंदरित राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सन 1986 अनुसार दहा गाभा घटक अभ्यासक्रमात समाविष्ट होते. विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांनी निश्चित केलेली शैक्षणिक धोरण केंद्रिभूत मानून विद्यापीठ आणि महाविद्यालयीन पातळीवरील सर्व विषयाचे पर्यायाने मराठी विषयाचे अभ्यासक्रमविषयक धोरण राबविण्यात येत आहे. अलीकडे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०१९-२० घोषित झाले आहे. त्याचा कच्चा मसुदा संकेतस्थळावर पडताळणीसाठी उपलब्ध आहे. त्यानुसार आगामी काळामध्ये अभ्यासक्रमांमध्ये गाभा घटक अंतर्भूत असतील. त्याप्रमाणे शिक्षकांनी अध्यापन करीत असताना स्विकारावयाचा दृष्टिकोन विद्यार्थ्यांना संस्कारित करण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. परंतु मराठीची शालेय व उच्च माध्यमिक स्तरावरील पाठ्यपुस्तके पाहता अधिकाधिक गाभा घटकांचा प्रचार करण्याची जबाबदारी मराठीने स्वतःहून आपल्या शिरावर घेतलेली दिसते. त्यामुळे सूक्ष्मरित्या संस्कारप्रवर्तन करण्यावर भर देण्याऐवजी ढोबळ माहिती व बोजड उपदेशपर लेखन त्यात समाविष्ट होत आहे. त्यामुळे विद्यार्थी विषयाचा धसकी घेतात. ही परिस्थिती बदलली पाहिजे. विद्यार्थ्यांना विषयाची गोडी वाटेल, अशी पाठ्यपुस्तके व अंतर्गत घटक शालेय पातळीवर पासून ते विद्यापीठ पातळीपर्यंत नेमावित.

विद्यार्थ्यांची मनोभूमिका-

उच्च माध्यमिक स्तरापर्यंत मराठीचा अभ्यासक्रम एकस्तरीय अध्ययनासाठी नेमण्याचे शैक्षणिक धोरण आहे. परंतु त्यासाठी मराठी विषयाकडे बघण्याचा सर्व अध्ययनशाखांच्या विद्यार्थ्यांचा दृष्टिकोन समान असायला हवा. पण प्रत्यक्षातील चित्र तसे नसते. विज्ञानशाखेतील विद्यार्थ्यांना मराठी विषयात फक्त उत्तीर्ण होणे अपेक्षित असते. तसेच मराठीला पर्याय म्हणून नेमलेली इतर विषयांचे अभ्यासक्रम सहजपणे अधिक गुणप्राप्ती करू शकणारे असतात. या विपरित परिस्थितीत मूळ धोरणातील समता प्रत्यक्षात उतरत नाही. ही परिस्थिती बदलण्यासाठी प्राप्त परिस्थितीत मराठी हा विषय पदवी स्तरावर अनिवार्य केला पाहिजे. तुर्तास महाराष्ट्र सरकारने पहिली ते बारावी पर्यंतच्या अभ्यासक्रमासाठी सर्व माध्यमांच्या शाळां -महाविद्यालयामध्ये मराठी विषय सक्तीचा शिकविला जाईल, अनिवार्य असेल,असे परिपत्रक काढले आहे. त्याद्वारे भाषाविषयक धोरण जाहीर केलेले आहे.

विद्यार्थ्यांच्या मनोभूमिकेवर खालील व्यावहारिक बाबींचाही प्रभाव असतो.

१. मराठी हा विषय घेऊन उत्तीर्ण झालेल्या पदवी व पद्व्युत्तर शिक्षित तरुणांना समाजात प्रतिष्ठा नसते. याचे कारण भाषेतील तज्ज्ञता आज महत्त्वाची समजत नाहीत.

२. ही वास्तविकता बदलण्यासाठी सरकारी निमसरकारी किंवा खाजगी कामकाजात/ कार्यालयात अन्यत्र भाषातज्ज्ञांच्या नेमणुकांसाठी मागणी करीत नाहीत.

३. प्रसार-माध्यमांच्या क्षेत्रात व व्यवहारिक क्षेत्रांमध्ये मराठी भाषेला व मराठी भाषिकांना सन्मान मिळत नाही. त्यामधून विद्यार्थ्यांच्या मानसिकतेवर प्रतिकूल परिणाम घडतो.

४. आजचा विद्यार्थी हा वाचन संस्कृतीचा एक महत्त्वपूर्ण घटक आहे. सांस्कृतिक कारणे सर्वश्रुत आहेत. परंतु वाचनाकडे विद्यार्थ्यांना वळविणे हे अध्यापकांचा समोरील आव्हान आहे. त्यासाठी त्यांच्या भावजीवनाशी सुसंवादी अध्ययन घटक अभ्यासक्रमात अधिक प्रमाणात समाविष्ट करणे आवश्यक ठरते.

५. भाषा सतत बदलत असते, प्रवाही आहे. त्याचप्रमाणे आमची अभ्यासक्रमाची चौकट बदल केली पाहिजे. एकोणिसाव्या शतकातील वाङ्मय हे मराठीच्या अभ्यासकांच्या दृष्टीने आधुनिक वाङ्मय आहे. आजच्या प्रगतशील युगात वावरणा-या विद्यार्थ्यांना ते जुन्या भाषेतील वाङ्मय वाटते. वास्तव लक्षात घेता पाठ्यपुस्तकातील अधिकांश भाग असा विद्यार्थ्यांना गोंधळात टाकणाऱ्या भाषेतील असतो.

६. आपली अभिजात भाषा, तिची महान परंपरा प्रत्येक मराठीच्या पाठ्यपुस्तकांमधून समाविष्ट झाली पाहिजे. त्याचप्रमाणे पदवी आणि पदव्युत्तर स्तरावरील मराठी विषयाच्या अभ्यासक्रमाचे स्तर लक्षात घेऊन नियोजन करणे विद्यार्थ्यांची मनोभूमिका बदलण्यास पुरक ठरेल.

मराठीचे अध्ययन - कला शाखा :

विद्यापीठीय पदवी आणि पदव्युत्तर परीक्षा अभ्यासक्रमामध्ये अनिवार्य (ऐच्छिक) मराठी विषय अध्यापनासाठी असतो. बी एस्सी आणि बी कॉम पदवी स्तरावर सामान्य मराठी म्हणजे द्वितीयभाषा म्हणून अध्यापन करतात. परंतु प्रस्तुत अध्यापन अनिवार्य मराठी असे करण्यात यावे. तसेच ऐच्छिक मराठीचा अभ्यासक्रम कला शाखेत पदवी अभ्यासक्रमात शिकवितात. पारंगत स्तरावर (एम ए) मराठीचा अभ्यासक्रम विशेष पद्धतीने अध्यापन करतात. याच्याशी संबंधित आराखडा मराठी साहित्यलक्षी अभ्यासक्रमाचे निदर्शक आहे. त्यामध्ये भाषा अधिष्ठान असावे, मराठीची प्रतिष्ठा वाढविण्यासाठी घटकांचा सामावेश करण्यात यावा. क्रमविकासी पद्धतीने दिसणारा हा आलेख अभ्यासक्रमाचे स्वरूप स्पष्ट करतो. उदाहरणार्थ मराठी साहित्याच्या अभ्यासातून

विद्यार्थ्यांची सौंदर्यदृष्टी विकसित करावयाची आहे, असे गृहित धरले तर सजकता वाढेल व त्यामुळे मराठीच्या विद्यार्थ्यांच्या मनोभूमिका बदलणे शक्य होईल. पदवी परीक्षा आणि पदव्युत्तर परीक्षांसाठी अभ्यासक्रमाचा आराखडयातील ठळक निर्देश पुढीलप्रमाणे नोंदविता येतील.

१. पदवी प्रथम वर्ष- कला : भाषालक्ष्यी अभ्यासक्रम आणि साहित्याचा प्रातिनिधिक परिचय व ठळक प्रवाह हे सूत्र घेऊन संपादित केलेली पुस्तके

२. द्वितीय वर्ष -कला : विविध वाङ्मय प्रकाराअंतर्गत त्याचे वैविध्यपूर्ण दर्शन घडविणारी पुस्तके किंवा घटक आणि लोकवाङ्मय

३. पदवी तृतीय वर्ष- कला : भाषिक कौशल्य, भाषालक्ष्यी अभ्यासक्रम, छंद, अलंकार, व्याकरण भाषाविज्ञान, साहित्यविचार, प्राचीन आणि पाश्चात्य एक वाङ्मयप्रकाराचा तात्विक अभ्यास, वाङ्मय आणि संस्कृती परस्पर संबंध, वाङ्मयाचा इतिहास

४. पदव्युत्तर अभ्यासक्रम : साहित्य आणि इतर कला, समीक्षा : मूलभूत संकल्पना आणि पद्धती, वाङ्मयेतिहास व संशोधन, लोकसाहित्य, भाषांतरमीमांसा, एका लेखकाचा सखोल अभ्यास, वाङ्मयीन अभिरूची, साहित्य आणि समाज, समकालीन वाङ्मयीन प्रवाह, सौंदर्यशास्त्र, तौलनिक साहित्याभ्यास इत्यादी.

कला शाखा वगळता इतर पदवी पातळीवरील मराठी हा विषय स्वीकारण्याची सोय अधिकधिक विषयांच्या सहकार्याने व विकल्पाने उपलब्ध आहे. खरे तर वाणिज्य, विज्ञान व इतर शाखांना पदवी परीक्षेसाठी मराठी विषय अनिवार्य असावा. आज आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रमासाठी पूरक वातावरण ठेवणे गरजेचे आहे. मराठी भाषा कौशल्य विकास अभ्यासक्रम आंतरविद्याशाखीय आणि आंतरविद्यापीठीय स्वरूपाचा नेमण्यात आलेला आहे. कला, विज्ञान व वाणिज्य शाखांतील विद्यार्थ्यांना आपण इतका स्वतंत्र चेहरा देत आहोत की, त्यांना परस्परांशी संवाद साधता येऊ नये, ही बाब सामाजिक अभिसरणाच्या दृष्टीने घातक आहे. इतर विद्याशाखांमधील विद्यार्थ्यांना हा विषय स्वीकारण्याची संधी मिळाली तर त्यातून मराठी विषयाच्या विकासाला हातभार लागेल.

नूतन अभ्यासक्रम – महाराष्ट्र शसनाने एक परिपत्रक काढून महाराष्ट्रात दहावीपर्यंत सर्व माध्यमांसाठी मराठी अनिवार्यतेबाबत धोरण जाहीर केले आहे.

१. परराज्यातून येणाऱ्या आणि अनिवासी भारतीय विद्यार्थ्यांना विशिष्ट परिस्थितीत मराठी विषय शिकण्यासाठी न घेण्याची सवलत उपलब्ध दिसते. वास्तविक अशी सवलत न ठेवता दहावी- बारावीपर्यंत ज्यांनी मराठीचे अध्ययन केलेले नाही, त्यांच्यासाठी मराठीचा देशी संवेदनस्वभाव दर्शविणारा स्वतंत्र अभ्यासक्रम विकल्प असावा.

२. अनिवार्य मराठी विषय धोरण निरपवादपणे राबविले जाईल, यावर भर द्यावा.

३. पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाची आखणी करत असताना सर्वप्रथम समाजाच्या गरजांचे निरीक्षण व चिकित्सा ही पायरी असते. त्यासाठी आपल्याकडे 'अभ्यासक्रम संशोधन मंडळ' अस्तित्वात यावे आणि त्याद्वारे शिक्षण प्रक्रियेतील ताजेपणा टिकवून धरणारे नवे अभ्यासक्रम तयार करावेत.

४. अभ्यासक्रमाची निर्मिती व समीक्षा अखंड चालणारी प्रक्रिया ठरायला हवी. उदाहरणार्थ पदवीनंतरच्या पदविका या स्वरूपाचे कालोचित असे नवगर्भ अभ्यासक्रम आखणे आवश्यक आहे. महाविद्यालयांना असे नाविन्यपूर्ण उपक्रम राबविता येतील. हे अभ्यासक्रम कोणत्याही विषयातील पदवीधारकांसाठी खुले असावेत.

५. आजकाल प्रसारमाध्यमांच्या वाढत्या प्रभावामुळे त्यात माध्यमांसाठी लेखन करणाऱ्यांची संख्या वाढतच आहे. मराठीत नव्याने लिहिणाऱ्यांसाठी काव्य- नाटक रसग्रहण अशा स्वरूपाचे अल्पमुदतीचे अभ्यासक्रम पूर्ण करण्याची

सोय असावी. त्या नाट्यप्रकारांची सांस्कृतिक परंपरा, घाट याच्याशी संबंधित असलेले वैशिष्ट्यपूर्ण अभ्यासक्रम असावेत.

६. विविध वाङ्मय प्रकाराचे कलात्मक सौंदर्य जाणून घेणारे अभ्यासक्रम सर्वसाधारण रसिक आणि नवोदित लेखक या दोघांनाही आकर्षित करू शकतील.

७. इतर विद्याशाखांच्या मदतीने नवे अभ्यासक्रम तयार करता येतील. उदाहरणार्थ- 'अनुवादित साहित्य' अशा अभ्यासक्रमातून नवनवीन प्रेरणा प्रवृत्तीची ओळख होईल. तसेच 'आंतरभारती'च्या उद्दिष्टांच्या दिशेने वाटचाल सुरु होईल.

८. तसेच लोकसाहित्याभ्यास, लोकप्रियसाहित्य, बोलीविज्ञान, उपयोजित, मराठी व्याकरणशास्त्राचा अभ्यास, साहित्याचा सामाजिक दृष्टीने अभ्यास इत्यादी अभ्यासपत्रिकाची भर घातली आहे.

अध्ययनपद्धती, अध्यापनपद्धती व मूल्यमापन :

सीमावर्ती परिसरात विद्यापीठीय अध्यापनपद्धती मुख्यतः पाठ्यपुस्तकानुगामी आहे. त्यामुळे पाठ्यपुस्तकांशिवाय जे अध्ययन घटक अभ्यासक्रमात अंतर्भूत असतात, ते दुर्लक्षित राहतात. त्यासाठी अध्यापकांशी सतत संवाद साधणारे एखादे नियतकालिक विद्यापीठाने चालविणे आवश्यक आहे.

अध्ययनपद्धती – चर्चासत्रे, परिसंवाद, वाङ्मय मंडळ, भित्तिपत्रक, अभ्यागत व्याख्याने इत्यादी नवपद्धतींचा अंतर्भाव शिक्षण प्रक्रियेत करणे गरजेचे आहे. विद्यापीठीय अभ्यासक्रम रसग्रहणात्मक व चिकित्सक उद्दिष्टे समोर ठेवतात. साहित्याच्या अध्ययनामागे शिक्षणशास्त्राने गृहित धरलेली उद्दिष्टे अशी दुर्लक्षित होतात. साहित्याच्या अध्ययनातून मिळणाऱ्या मर्मदृष्टीमुळे विद्यार्थ्यांतील सुप्त लेखक जागा होणे सहाजिक असते. त्यासाठी सर्जनशील निर्मितीला वाव व दिशा देणारी व्यवस्था अभ्यासक्रमात समाविष्ट असावी.

अध्यापनपद्धती– सद्यःस्थितीत इंटरनेट, संगणक, मोबाईल यामुळे जगभरातील माहितीची उपलब्धता प्रचंड प्रमाणात आणि वेगाने होत आहे. सीमावर्तीक्षेत्र त्याला अपवाद नाही.. विद्यार्थ्यांमध्ये भावी अभ्यासक तयार करण्यासाठी अभिवृत्ती निर्माण व्हावी लागते, ती अशा उपक्रमातून साधण्याचा प्रयत्न करता येतो. विद्यार्थ्यांवर संस्कार होणे महत्वाचे आहे. करिता चर्चासत्र, परिसंवादामधून सभाधीटपणा येण्याकरिता अध्यापनातून विद्यार्थ्यांच्या अभिव्यक्तीला संधी उपलब्ध करून देणे, शैक्षणिक ध्वनिफिती, चित्रपती इत्यादी पूरक शैक्षणिक साधनांची मदत घेणे, अध्ययन आणि अध्यापन पद्धतीचा कसं पारखून क्षमता मूल्यमापन पद्धती टिकविणे, महत्वाचे वाटते. प्रस्तुतीकरण, वाचनीय, श्रवणीय, अभिनयरूप गटचर्चा, परिसंवाद, प्रश्नमंजुषा अशा विविध उपक्रमामधून विद्यार्थ्यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाची निर्मिती होऊ शकते. परंपरागत व्याखनपद्तीला जोडून अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर करणे प्रभावीअध्यापनासाठी महत्त्वाचे आहे.

मूल्यमापन - पदवी व पद्व्युत्तर पातळीवरील अभ्यासक्रमात प्रकल्पपद्धती स्वीकारून सर्जनशील लेखनाला प्रोत्साहन देण्याचे धोरण असावे. त्यासाठी अंतर्गत गुणांची तरतूद असावी आणि गटचर्चा, परिसंवाद, मौखिकी, चाचणी इ. मूल्यमापन कसोटया असाव्यात. माहितीचे वर्गीकरण, विश्लेषण, रूपांतरण होण्यासाठी संशोधनाची शिस्त अंगी बाणवावी लागते. त्यासाठी विद्यार्थी आणि ग्रंथालय यांच्यात जवळीक साधली पाहिजे. कोश हाताळणे, संदर्भ शोधणे, सूची तयार करणे या कौशल्यावर आधारित उपक्रमाचा मूल्यमापनासाठी अंतर्भाव करणे गरजेचे ठरेल. ते वेगवेगळ्या पातळीवर विविध पद्धतीने करणे शक्य आहे.

संगणकीकरणाच्या काळात आंतरजाल-महाजाल (इंटरनेट) सुविधेमुळे माणसाच्या दैनंदिन जगण्यामध्ये गतिमानता प्राप्त झाली आहे. विकिपीडिया, ई-मेल, व्हाट्सअप, फेसबूक, चित्रपट, नाट्यरूपांतरण अशा माध्यमांत, प्रसारमाध्यमे, दूरचित्रवाहिनीवरील वृत्त, जाहिरात, बातमी, मुलाखत अशा विविध ज्ञान- कौशल्यांची माहिती प्रायोगिक पद्धतीने विद्यार्थ्यांमध्ये संस्कारित करणे गरजेचे आहे.

**समारोप –**

विद्यापीठीय शिक्षणपद्धतीचा उपहास अनेक साहित्यिक मंडळींनी केलेला आहे. त्यामध्ये नारायण सुर्वे यांचे 'माझे विद्यापीठ' कवितासंग्रह पारंपरिक कालबाह्य ज्ञानाचे वितरण करणारी संस्था अशा स्वरूपाची विद्यापीठाची प्रतिमा जनमानसात निर्माण होऊ नये, याकरिता विचारप्रक्रिया घडविणारी अध्यापनपद्धती विकसित करणे अध्यापकांना समोरील आव्हान आहे. अभिजात वाङ्मय ही मराठीची मोठी श्रीमंती आहे. माझ्या डोळ्यासमोर असे एक चित्र तरळून जाते की, या शतकात वेगवेगळ्या कारणांनी संस्कृती मुळापासून खोदलेली आहे. आज भेटलेले लोक काही काळानंतर आपल्या मुळांचा कसोशीने शोध घेऊ लागतील. त्याप्रमाणे तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे भाषेचे व साहित्याचे जतन करणे शक्य झालेले आहे. त्यामुळे या शतकाच्या शेवटी पुन्हा एकदा वैभवाचा कालखंड येईल. त्याचप्रमाणे त्यावेळी अभिजात मराठीचे भांडाराकडे जगाचे लक्ष वेधले जाईल. त्यासाठी मराठीच्या अध्ययन-अध्यापनाची परंपरा सकसपणे जोपासण्याची जबाबदारी आपणा सर्वांवर आहे. तेव्हा नव्या वाटा चोखाळून आपण सारेच मराठीचे अध्यापन अर्थपूर्ण करण्यासाठी कटिबद्ध बनूयात.

**संदर्भसूची-**

केळकर अशोक रा—मध्यमा, नेता पब्लिक पब्लिशिंगहाऊस पुणे, 1996
पाटील लीला- मराठीचे अध्यापन व मूल्यमापन, व्हिनस प्रकाशन पुणे, 1978
संपा. भागवत श्री.पु. आणि इतर- साहित्य अध्यापन आणि प्रकार, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, 1987
विदावन कुद्रे - वाङ्मयाचे महाविद्यालयीन अध्यापन, कोल्हापूर 1987
कुंडले म. बा. - अध्यापनशस्त्र पध्दती , (१९७२)
महाले संजीवनी - अध्यापन प्रतिमाने आणि अध्ययनशैली
चौधरी प्र.श्रा. व भुकन साहेबराव - मराठीचे अध्यापन , व्यंकटेश प्रकाशन जळगाव, २०१७
पवार ना.ग.-मातृभाषामराठीचे आशययुक्त अध्यापन, नित्यनुतन प्रकाशन, पुणे, २००८
अभ्यासक्रम - बी ए - उस्मानिया यूनिवर्सिटी, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड व गुलबर्गा विद्यापीठ कलबुर्गी